**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २४ फेब्रुवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **चालू आर्थिक वर्षासाठी ११ हजार ९५५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या विधानसभेत सादर.**
2. **गोंदिया – जबलपूर रेल्वेमार्ग दुहेरीकरण प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी.**
3. **नागपूर स्थित ब्रह्माकुमारीज संस्थेच्या "एकता आणि विश्वासातून महाराष्ट्राचा सुवर्णकाळ" या राज्यस्तरीय अभियानाचा उद्या राष्ट्रपतींच्या उपस्थितीत शुभारंभ.**
4. **बिनचूक मतदार याद्या हा लोकशाहीचा पाया असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचं प्रतिपादन.**

-----------------------------------------

विधिमंडळ अधिवेशन / पुरवणी मागण्या

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत ११ हजार ९५५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. महसुली तूट भरून काढण्यासाठी पुरवणी मागण्या कमी ठेवण्यात आल्या आहेत. कृषी पंप आणि यंत्र मागावरल्या अनुदानासाठी ३ हजार ११२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योगांसाठी ८०३ कोटी प्रस्तावित आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये राज्यावर ९ कोटी ३२ लाख रुपये कर्जाचा बोजा वाढण्याचा अंदाज, यात वर्तवण्यात आला आहे.

-----------------------------------------

विधिमंडळ कामकाज

राज्य विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबईत सुरु आहे. ऐकुया आजच्या विधी मंडळ कामकाजाचा आढावा आमच्या प्रतिनिधींकडून -

***(व्हॉइस कास्ट - नम्रता फलके)***

**अंमली पदार्थांबाबत सरकारचं शून्य सहिष्णुता धोरण आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत सांगितलं. अमली पदार्थांची तस्करी करण्याचे वेगवेगळे मार्ग शोधले जात आहेत, कुरिअरद्वारे अमली पदार्थ पाठवले जात असल्याचं आढळून आलं असून अशा कुरिअरवर कारवाई केली जाईल, तसंच अमली पदार्थ विक्रीत दोषी ठरलेल्या पोलिसांना बडतर्फ केलं जात आहे असंही त्यांनी सांगितलं. नसीम खान, वरूण सरदेसाई यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता.**

*(होल्ड बाईट- फडणवीस १७ सेकंद)*

डिजिटल अटक नावाची कोणतीही तरतूद कायद्यात नाही, त्यामुळे असा फोन आल्यास तो खोटेपणा आहे, असं समजावं, असं मुख्यमंत्र्यांनी आज प्रश्नोत्तराच्या तासात स्पष्ट केलं. अशा प्रकरणात एक नऊ तीन शून्य (१९३०) या क्रमांकावर लगेच तक्रार करावी, असं ते म्हणाले. त्याआधी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी डिजिटल अटकेबद्दल राज्य सरकार राबवत असलेल्या जनजागृतीविषयी माहिती दिली. समाजवादी पार्टीचे आमदार अबू आझमी आणि आशुतोष काळे यांनी याबाबतचा प्रश्न विचारला होता. राज्यातील एकूण ४७९ धर्मादाय रुग्णालयांपैकी केवळ १३४ रुग्णालये सध्या आयुष्यमान भारत आणि महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना एकत्रितपणे राबवत आहेत. उर्वरित रुग्णालयांनी या प्रक्रियेला विरोध करत न्यायालयात धाव घेतली होती. पण न्यायालयाने कोणतीही स्थगिती दिलेली नसतानाही काही रुग्णालये सहकार्य करत नव्हते. त्यामुळे राज्य सरकारने आता कायद्यात बदल केला असून ही सर्व रुग्णालये सरकारच्या पूर्णपणे अखत्यारीत आली आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधासभेत दिली.

*(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ३१ सेकंद)*

विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी चंद्रपूरसह राज्यातील अनेक जिल्ह्यांत रुग्णांना आरोग्य योजनांचा लाभ मिळत नसल्याचा मुद्दा प्रश्नोत्तराच्या काळात सभागृहात मांडला होता. राज्यातल्या अनेक भागांत काल अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीचं सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले जातील असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत सांगितलं. कॉग्रेस नेते विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे धनंजय मुंडे यांनी स्थगन प्रस्तावाच्या सूचनेत हा मुद्दा उपस्थित केला. मराठवाडा, विदर्भासह कोकणात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचं मोठं नुकसान झालं आहे, याचे तात्काळ पंचनामे करून मदत करावी अशी मागणी विजय वडेट्टीवार आणि धनंजय मुंडे यांनी केली. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातल्या कामकाजासाठी तालिका अध्यक्षांच्या नियुक्तीची घोषणा आज विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विधानसभेत केली. योगेश सागर, संजय केळकर, दिलीप लांडे, चंद्रकांत नवघरे, सुनिल प्रभू, राजू खरे, अमित झनक आणि समाधान आवताडे हे तालिका अध्यक्ष म्हणून काम पाहतील. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी आज चित्रा वाघ, कृपाल तुमाने, विक्रम काळे, राजेश राठोड, सुनील शिंदे यांची तालिका सभापती म्हणून घोषणा केली. त्यापूर्वी प्रज्ञा सातव यांचा विधान परिषद सदस्य पदाचा राजीनामा मंजूर केल्याची घोषणा त्यांनी केली.

-----------------------------------------

मंत्री नरहरी झिरवळ

अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्या राजीनाम्याची मागणी करत आज महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनात धरणं आदोलन केलं. या सदस्यांनी यावेळी भाजपाच्या नेतृत्वाखालच्या महायुती सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप करत घोषणाबाजीही केली. मंत्रालयातल्या झिरवळ यांच्या विभागातल्या कारकुनाला लाचखोरीच्या आरोपावरुन या महिन्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकानं अटक केल्यामुळे झिरवळ यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधी पक्ष सदस्यांनी लावून धरली आहे.

-----------------------------------------

अभिभाषण चर्चा

सरकार केवळ भुलथापा देऊन आकर्षक घोषणा करून लोकांची फसवणूक करत आहे अशी जोरदार टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी केली. ते विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावरल्या चर्चेत बोलत होते. राज्यात रोजगार निर्मिती होत नाही, सरकारी नोकऱ्यांचं कंत्राटीकरण केलं जात आहे, बेरोजगारीने उच्चांक गाठला आहे, मात्र सरकार लोकांना केवळ झुलवत ठेवत आहे अशी टीका जाधव यांनी केली.

-----------------------------------------

मंत्रीमंडळ निर्णय-वैष्णव

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीनं रेल्वे मंत्रालयाच्या एकूण 9,072 कोटी रुपयांच्या तीन महत्त्वाच्या प्रकल्पांना मंजुरी दिली आहे अशी माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज माध्यमांना दिली. यामध्ये गोंदिया - जबलपूर रेल्वेमार्ग दुहेरीकरण हा विदर्भ आणि मध्यप्रदेशासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असून तो प्राधान्यानं राबविण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त पुनरख-कियूल तसेच गम्हरिया-चांडील तिसरी आणि चौथी रेल्वे लाईन या प्रकल्पांचाही समावेश आहे. या प्रकल्पांमुळे महाराष्ट्र, मध्यप्रदेश, बिहार आणि झारखंडमधील 8 जिल्ह्यांतील सुमारे 307 किमी रेल्वे जाळ्याचा विस्तार होणार आहे, असं वैष्णव म्हणाले -

***(होल्ड बाईट - वैष्णव - ४५ सेकंद)***

या प्रकल्पांमुळे सुमारे 5,400 हून अधिक गावांना थेट रेल्वे संपर्क मिळून जवळपास 98 लाख लोकसंख्येला लाभ होणार आहे.

-----------------------------------------

द्रौपदी मुर्मू

महाराष्ट्रात सामाजिक एकता, परस्पर विश्वास आणि सकारात्मक मूल्ये अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने ब्रह्माकुमारीज संस्थेच्या “एकता आणि विश्वासातून महाराष्ट्राचा सुवर्णकाळ” या राज्यस्तरीय अभियानाचा शुभारंभ जामठा येथील विश्व शांती सरोवर परिसरात उद्या दिनांक २५ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, ब्रह्माकुमारीज मुख्यालय माउंट आबूचे राजयोगी बी.के. मृत्युंजय भाई आणि राजयोगिनी बी.के. चंद्रिका दीदी यांची देखील कार्यक्रमाला उपस्थिती राहणार आहे. या अभियानांतर्गत व्यसनमुक्त समाज, संतुलित जीवनशैली, स्वच्छता, मूल्याधिष्ठित शिक्षण, योग, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक सलोखा यावर भर देण्यात येणार आहे. या परिसरात होणारी गर्दी लक्षात घेता सुरक्षा नियंत्रणाच्या दृष्टीने नागपूर, जबलपूर, भंडारा, अमरावती आणि वर्धा या मार्गावरील वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत. दरम्यान, मुंबईत लोकभवन इथं हिंदुजा हॉस्पिटलनं आयोजित केलेल्या जीवरक्षण आणि तंदुरुस्त भारताची निर्मिती, या देशव्यापी मोहिमेचं उद्घाटन आज राष्ट्रपतींच्या हस्ते झालं. सर्व भारतीयांना उत्तम आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी भारत सरकारनं अनेक महत्वपूर्ण उपाययोजना केल्याचं त्यांनी आपल्या संबोधनात सांगितलं. देशभरात १ लाख ८० हजारांपेक्षा जास्त आयुष्यमान आरोग्य मंदिर कार्यरत असल्याचं त्या म्हणाल्या.

-----------------------------------------

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार

बिनचूक मतदार याद्या कोणत्याही देशाच्या लोकशाहीचा पाया असल्याचं प्रतिपादन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथे भरलेल्या केंद्रीय निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयुक्तांच्या राष्ट्रीय गोलमेज परिषदेला संबोधित करत होते. देशातल्या अपात्र मतदारांना वगळून फक्त पात्र मतदारांना मतदार यादीत समाविष्ट करता यावं, यासाठी मतदार याद्यांच्या विशेष पुनरीक्षणाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

-----------------------------------------